# Topic-02

## Fundamental Rights, Duties & Directive Principles
## मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वे

# मुलभूत हक्क

- व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आवश्यक असून लोकशाही देशात हक्कांना घटनात्मक स्थान दिल्याने हक्कांचे रूपांतर मुलभूत हक्कांमध्ये झालेले आहे.
- मुलभूत हक्क म्हणजे असे हक्क, जे देशाच्या राज्यघटनेत लिखित स्वरूपात असतात व ज्या हक्कांना न्यायालयीन संरक्षणही असते.
- भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये सहा हक्क दिले असून ते शासनावर बंधनकारक आहेत.
- कायदेशीर संरक्षणही प्रदान करण्यात आले आहे.

# मुलभूत हक्क वैशिष्ट्ये

- सविस्तर स्पष्टीकरण
- अंधानुकरण नाही
- बंधनकारक
- सकारात्मक व नकारात्मक
- न्यायालयीन संरक्षण
- अधिकारांवरील मर्यादा व बंधने
- परकीय नागरिकांचा विचार नाही

# भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क

- भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्क विश्लेषित केले असून घटना अंमलात आली तेव्हा त्यांची संख्या ७ होती
- मात्र १९७८ च्या ४४ व्या घटनादुरूस्तीने मालमत्तेचा हक्क वगळून त्याला कलम ३००- अ' मध्ये वैधानिक स्वरूप दिल्याने सध्या हक्कांची संख्या सहा झाली आहे.
- कलम १२ मध्ये 'राज्य' म्हणजे काय? याचे विश्लेषण
- कलम १३ मध्ये मुलभूत हक्कांविरूद्ध असणारा कायदा बेकायदेशीर ठरविण्याची तरतूद केली आहे.

# प्रमुख मूलभूत हक्क

- समतेचा हक्क (कलम १४ ते १८)
- स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२)
- शोषणाविरूद्ध दाद मागण्याचा हक्क (कलम २३ व २४)
- धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)
- सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)
- घटनात्मक उपायांचा हक्क (कलम ३२)

# 01.समतेचा हक्क (कलम १४ ते १८)

- कायद्यापुढे समता (कलम–१४) – सर्व भारतीय नागरीकांना कायद्यापुढे समान मानले जाईल.
- भेदभावाचा अभाव (कलम १५ ) – जात, धर्म, जन्मस्थान यावरून भेदभाव केला जाणार नाही.
- संधीची समानता (कलम १६)– राज्याच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक नोकऱ्यात अथवा जागेवर नियुक्ती
- अस्पृश्यता निवारण (कलम १७) – अस्पृश्यता पाळण्यास सक्त मनाई करण्यात आली.
- पदव्यांची समाप्ती (कलम १८)– कोणत्याही भारतीय नागरीकास लष्करी अथवा शैक्षणिक क्षेत्र वगळून कोणत्याही प्रकारच्या पदव्यांवर बंदी घालण्यात आली.

# 02.स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२)

- कलम १९ : भारतीय नागरीकांना
- अभिव्यक्ती स्वातंत्र्य,
- शांततापूर्वक निःशस्त्र
- सभा घेण्याचे स्वातंत्र्य,
- संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य,
- संचार स्वातंत्र्य,
- वास्तव्य स्वातंत्र्य
- व्यवसाय स्वातंत्र्य असे सहा स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहेत.
- **कलम २०**
- कोणत्याही व्यक्तीला त्याने केलेल्या गुन्ह्यांबद्दल तत्कालीनकायद्यानुसारच शिक्षा केली जाईल.
- व्यक्तीकडून घडलेल्या एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा शिक्षा केली जाणार नाही
- कोणत्याही व्यक्तीला स्वतः विरूद्ध साक्ष देण्यास भाग पाडलेजाणार नाही.
- **कलम २१ :**
- कोणत्याही व्यक्तीचे जीवित स्वातंत्र्य कायद्याने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीशिवाय हिरावून घेतले जाणार नाही.
- कलम २१-अ : ६ ते १४ वर्षाखालील प्रत्येक मुला-मुलीस मोफतव सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क.
- कलम २२ :
- कोणत्याही व्यक्तीला अटकेची कारणे सांगितल्याशिवाय अटकेत ठेवता येणार नाही तसेच अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात येईल.

# 03.शोषणाविरूद्ध दाद मागण्याचा हक्क (कलम २३ व २४)

- कलम २३

माणसांची खरेदी-विक्री आणि वेठबिगारी पद्धतीस मनाई केली आहे.

- कलम २४

१४ वर्षाखालील मुलांना खाणीच्या अथवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी घातलेली आहे.

# धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)

- ## कलम २५

प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माचे आचारण, पालन व प्रसार करण्याचा अधिकार आहे.

- ## कलम २६

धार्मिक संस्थान स्थापन करणे, तिचा कारभार पाहणे, खर्चासाठी संपत्ती बाळगणे इत्यादी अधिकार धार्मिक संप्रदायास देण्यात आले आहेत.

- ## कलम २७
- कोणत्याही धार्मिक कार्यक्रमासाठी सक्तीने कर गोळाकरता येणार नाही.
- ## कलम २८
- शासकीय अनुदान मिळणाऱ्या शिक्षण संस्थेतून धार्मिकशिक्षण देण्यास बंदी घातलेली आहे.

# सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)

- कलम २९ :

प्रत्येक भारतीय नागरीकास स्वतःची विशिष्ट भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकार राहील.

- कलम ३० :

धार्मिक किंवा भाषिक आधारावर सर्व अल्पसंख्य वर्गाना

आपल्या पसंतीप्रमाणे शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा

अधिकार आहे.

# घटनात्मक उपयोजनेचा हक्क(कलम ३२)

भारतीय नागरीकांना आपल्या हक्कांवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी घटनात्मक उपयोजनेचा हक्क दिला आहे. घटनात्मक उपयोजनेच्या हक्कानुसार व्यक्तीच्या मुलभूत हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयाला पुढील पाच आदेश काढता येतात.

1–बंदी प्रत्यक्षीकरण:

2–परमादेश :

3–प्रतिषेध:

4–अधिकार पृच्छा :

5–उत्प्रेषण :

# मुलभूत कर्तव्ये

- भारतीय राज्यघटनेत १९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीने प्रकरण चार मध्ये कलम ५१-अ' यात दहा कर्तव्ये अंतर्भूत करण्यात आली. सद्यस्थितीत कर्तव्यांची संख्या अकरा झाली असून ती
- पुढीलप्रमाणे–
- १. राज्यघटना, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर बाळगणे.
- २. स्वातंत्र्य चळवळीच्या उदात्त आदर्शांचे जतन करून ते आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे.
- ३. देशाचे सार्वभौमत्व, ऐक्य आणि एकात्मता कायम राखणे.
- ४.देशाचे संरक्षण करणे आणि आवश्यकतेनुसार राष्ट्राची सेवा करणे.

- ५. देशातील सर्व भाषा, प्रदेश व धर्म यांच्यातील भेदभाव विसरून लोकांमध्ये एकोपा व बंधुभाव निर्माण करावा आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक ठरणाऱ्या प्रथांचा त्याग करावा.
- ६. आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जतन करून त्याची कदर करणे.
- ७. नैसर्गिक पर्यावरणाचे, साधन संपत्तीचे रक्षण करून प्राणिमात्रांबद्दल भूतदया दाखविणे.
- ८. शास्त्रीय दृष्टिकोन, मानवतावाद आणि चिकित्सक वृत्ती विकसित करणेकिंवा अंगी बानविणे.
- ९. हिंसेचा त्याग करून सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे.
- १०. राष्ट्राची सर्व क्षेत्रात प्रगती व्हावी, राष्ट्राला उच्च दर्जा प्राप्त व्हावा यादृष्टीने व्यक्तीगत व सामुहिक प्रयत्न करणे.
- ११. सहा ते चौदा वर्ष वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या पालकांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. (८६ वी घटनादुरुस्ती)

# राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

- भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरण मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली आहेत.
- **मार्गदर्शक तत्वांचे स्वरूप**
- **आर्थिक तत्त्वे :**
- १) कलम ३९ :सरकारने स्विकारायची धोरणविषयक तत्त्वे
- २) कलम ४० :राज्य आपली आर्थिक शक्ती आणि विकास यांच्या मर्यादित प्रत्येक नागरिकाला काम मिळवून देण्याची

- ३.कलम ४१ :काम, शिक्षण व इतर बाबतीत सरकारी मदत
- ४.कलम ४२ :कामाबाबत न्याय व प्रसूती साहाय्य
- ५.कलम ४३ :कामगारांसाठी निवाहवेतन
- ६.कलम ४३ (क) :व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग
- ७.कलम ४८ :शेती व पशुसंवर्धन
- ८.कलम ४८ (क) :पर्यावरण संरक्षण व वन्यजीव रक्षण
- **सामाजिक तत्त्वे**
- १.कलम ४५ :शिक्षण
- २.कलम ४६ :दुर्बल घटकांच्या शिक्षण व आर्थिक हिताची जोपासना
- ३.कलम ४७ :राहणीमान व आरोग्य
- ४) कलम ४९ :स्मारके, स्थाने यांचे जतन

# राजकीय तत्त्वे

- १)कलम ४० :ग्रामपंचायतींची स्थापना
- २) कलम ५०:न्याय व शासनयंत्रणा यांचे विभाजन

# न्यायालयीन तत्त्वे

१.कलम ३९ (क) :समान न्याय व कायदेविषयक साहाय्य
२.कलम ४४ :समान नागरी कायदा

# परराष्ट्र संबंधविषयक तत्त्वे

५१ व्या कलमात परराष्ट्र संबंध
१.राष्ट्राराष्ट्रांमध्ये शांतता नांदावी आणि शांततेचे वातावरण निर्माण होईल अशाच प्रकारेचे धोरण आखणे.
२.सर्व राष्ट्रांनी एकमेकांशी परस्पर न्याय भावनेने वागावे तसेच परस्परांविषयीआदर बाळगणे.
३) जगातील संघटित लोकसमूह आपापसात व्यवहार करीत असतानात्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय कायद्याचा व करीराचा मान राखणे.
४) आंतरराष्ट्रीय तंटे संघर्ष लवादामार्फत मिटविण्यास शासन प्रोत्साहन देईल व त्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

# मार्गदर्शक तत्वांचे महत्त्व

- कल्याणकारी राज्याची निर्मिती
- सामाजिक व आर्थिक लोकशाही
- सामाजिक न्यायाची प्रस्थापना
- धोरण निर्मितीचा आधार
- शासनावर मर्यादा
- लोकशाही समाजवादी राज्याची प्रस्थापना

# *Thank You*